# दुग्धोत्पादनाकरिता पाण्याचे महत्व

**डॉ. चैतन्य पावशे**

पशुजनन, मादीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग

स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशु विज्ञान संस्था, अकोला.



माणसांना जसे स्वच्छ व मुबलक पाणी प्यावयास लागते तसेच जनांवराना सुध्दा लागते पण आपण जनावराच्या पाण्याकडे दुर्लक्ष करतो.

पाणी हा आहारासोबत अंत्यत आवश्यक घटक आहे. त्यामुळे जनावरांना पिण्यास स्वच्छ, गोड, जंतुविरहित पाणी देणे महत्वाचे असते. सर्वसाधारण पणे १ लिटर दूध तयार होण्यासाठी ४-५ लिटर पाणी पिणे आवश्यक असते त्यामुळे जास्त दूध उत्पादन देणाऱ्या जनावरांना दिवसभर पाण्याचा साठा/पुरवठा असल्यास उत्तम असते किंवा दिवसातून किमान ४ वेळा पाणी द्यावे.

पाणी पिण्याचे प्रमाण हे जनावरांच्या शरीराचा आकार, हवामान, आहार, गाभणपणा व दूध उत्पादन ह्या गोष्टीवर अवलबूंन असते.

- हिरव्या चाऱ्याचे प्रमाण जास्त असेल तर जनावर पाणी कमी पिते कारण हिरव्या चाऱ्यामध्ये ८०-८५% पाण्याचे प्रमाण असते.
- वातावरणातील तापमान अधिक असेल तर जनावर पाणी जास्त पिते तसेच थंडीच्या दिवसात पाणी कमी पिते.
- आजारी व निरोगी जनावरांची पाणी पिण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी. कारण दुषित पाण्यामुळे जंतूचा प्रार्दुभाव होण्याची शक्यता असते.
- पाणी पिण्याचे भांडे किंवा हौद स्वच्छ असावा तसेच पाण्याची टाकी नियमित स्वच्छ करावी व दर दोन महिन्यांनी पाण्याचा हौद किंवा टाकीला चुना लावावा.
- क्षारयुक्त पाणी असेल तर ते पाणी शक्यतो जनावरास पिण्यासाठी टाळावे.
- शरीराचे तापमान योग्य राखण्यासाठी उन्हाळ्यामध्ये जनावरांना मुबलक प्रमाणात थंड पाणी पाजावे.
- कामाचे बैल व लहान वाढत्या वासरांना जास्त प्रमाणात पाणी लागते.